# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि,गौतमनगर.

पो,कोळपेवाडी,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर

**जा.क्र.ऊस विकास/२८९६** **दिनांक -२७/११/२०२४**

## --परिपत्रक--

## ' पुर्वहंगामी ऊस लागवड धोरण'

## लागवड हंगाम सन २०२४-२५ (गळीत हंगाम सन २०२५-२६ )

कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सर्व उत्पादक सभासद व क वर्ग ऊस उत्पादकांना विनंतीपुर्वक कळविणेत येते की,कारखान्यास गळीत हंगामाचे सुरवातीस पुरेसा पक्व ऊस उपलब्ध होणेकरीता लागवड हंगाम सन २०२४-२५ (गळीत हंगाम २०२५-२६) करीता पुर्व हंगामी ऊस लागवडीचे धोरण कारखान्याचे मा.संचालक मंडळाने खालीलप्रमाणे घेतलेले आहे.

**पुर्व हंगामी ऊस लागवड धोरण -**

**१. कालावधी व शिफारशीत ऊस जाती -**

| लागवड हंगाम | लागवड कालावधी | शिफारशीत ऊस जाती |
|---|---|---|
| **पुर्व हंगामी** | १ ऑक्टोबर २०२४ ते १५ डिसेंबर २०२४ पर्यत | को-८६०३२, कोएम-०२६५, व्हीएसआय-१२१२१,कोसी-६७१ , को-व्हीएसआय-०३१०२,एमएस १०००१, को-व्हीएसआय १८१२१,फुले ऊस १५०१२,फुले ऊस १३००७,फुले ऊस १५००६ |
| | | |

**२. लागवड पध्दत -:** केन हार्वेस्टरने ऊस तोडणी करणेचे दृष्टीने ऊस लागवड ही ४ ते ५ फुट रुंद सरीमध्ये करणे.

**३. ऊस बेणे -:** पुर्वहंगामी ऊस लागवडीकरीता ऊस बेणेची गरज असणा-या शेतक-यांना कारखाना हमीवर रु.८०००/- पर्यत ऊस बेण्याचा उधारीने पुरवठा करण्यात येईल. तसेच कार्यक्षेत्रातील ऊस बेणेचा खरेदी विक्रीचा दर ऊस उत्पादकांनी परस्पर ठरवावयाचा आहे. परंतु कारखान्याची बेणे विक्री चिठ्ठी असल्याशिवाय परस्पर बेणे विक्री करु नये.

**४. ऊस रोपे -:** ऊस उत्पादकाकडुन प्रति रोप रु.१/- याप्रमाणे बुकींग रक्कम रोख घेऊन व प्रती रोप रु.१/-अनुदान सदर ऊस गळीतास आल्यानंतर देण्यात येईल आणि उर्वरीत रक्कम ऊस उत्पादकांचे नावे टाकण्यात येईल.ऊस रोपाचा पुरवठा कारखान्याने नियुक्त केलेल्या नर्सरीज कडुन करण्यात येईल.(ऊस रोपांची प्रति एकर कमाल मर्यादा ५००० राहिल.) जे ऊस उत्पादक ऊस रोपापासुन ऊस लागवड करतील त्यांची ऊस नोंद तारीख एक महिना अगोदर ग्राह्य धरण्यात येईल.**पुर्वहंगामी ऊस लागवडी करीता अनुदानीत ऊस रोपांचा पुरवठा दि.१५/१/२०२५ अखेर करण्यात येईल.**

**५. रासायनिक खते व कर्मवीर बायोअर्थ -:** २ गोणी युरीया व २ गोणी इफको (१०:२६:२६)अथवा तत्सम खते तसेच ठिबक सिंचनावरील ऊस पिकास विद्राव्य खते उधारीने पुरवठा.**(रु.३५००/- रक्कमेपर्यत प्रति एकर)**

कर्मवीर बायोअर्थ ची **प्रति गोणी किमंत रु.२५०/-(जी.एस.टी.सह)** आहे. कर्मवीर बायोअर्थ रोखीने खरेदी करावयाचे झाल्यास संपुर्ण रक्कम रोख भरणा कारखान्याकडे करावा लागेल तसेच उधारीने खरेदी करावयाचे असल्यास ऊस उत्पादकांना प्रती गोणी ॲडव्हान्स रक्कम रु.५०/- रोख भरणा कारखान्याकडे करावा लागेल. त्यासाठी उसाची नोंद विचारात घेतली जाईल. उर्वरीत रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज (१२.५%) ऊस उत्पादकांचे गळीतास येणाऱ्या ऊस बिलातून वसुल करण्यात येईल.

**६. तणनाशके -:** ऊस पिकातील तण नियंत्रणाकरीता कारखान्यामार्फत मेट्रीब्युझीन ७०%WP चा धोरणाप्रमाणे उधारीने उपलब्धतेनुसार पुरवठा करण्यात येईल.

**७. दुय्यम अन्नद्रव्ये (गंधक) -:** दुय्यम अन्नद्रव्ये म्हणुन गंधक (सल्फर) एकरी १० किलो या प्रमाणात रोखीने धोरणाप्रमाणे उपलब्धते नुसार पुरवठा करण्यात येईल.

**मागील पानावर/-**

**८. रोखीने विक्री -:** ऊस उत्पादकांना गंधक व व्ही.एस.आय निर्मित सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते (मल्टीमायक्रोन्युट्रीयंट), द्रवरुप जैविक खते,पोषके व जैविक किटकनाशके यांचा कारखाना धोरणाप्रमाणे रोखीने उपलब्धतेनुसार पुरवठा करण्यात येईल.

**९. नियम व अटी -:**

**९.१** रासायनिक खते,तणनाशके, ऊस रोपे,कर्मवीर बायोअर्थ इत्यादी वस्तुरूप सहाय्याची त्याचप्रमाणे बेणे ॲडव्हान्स रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज (१२.५%) ऊस उत्पादकांचे ऊस बिलातून किंवा सदरचा उस कोणत्याही कारणास्तव गळीतास न आल्यास एकत्रीत कुटुंबातील देय पेमेंट मधुन अथवा जामिनदारांच्या ऊस पेमेंट मधुन सव्याज वसुल करण्यात येईल.

**९.२** पुर्वहंगामी ऊस लागवडीची नोंदणी लागवड झाल्यांनतर ३ दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील.याशिवाय एकत्रित कुटुंबातील संपुर्ण ऊस क्षेत्राची नोंद कारखान्याकडे करणे आवश्यक राहील.एकदा केलेली ऊस नोंद कुठल्याही परीस्थितीत बदलण्यात येणार नाही.

**९.३** सभासदांचे अंतर्गत कौटुबिक शेत जमिनीच्या प्रश्नामुळे निर्माण होणारे वाद व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबधित सभासदांची राहील.तसेच ज्या ऊस उत्पादक सभासदांच्या ऊस नोंद केलेल्या क्षेत्राला रस्ता नाही.अशा ऊस उत्पादक सभासदांनी स्वतःच्या जबाबदारीवर ऊस तोड करुन स्वतःच्या वाहनाने कारखान्यावर पोहच करावा.रस्त्याअभावी ऊस उभा राहिल्यास त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही.

**९.४.** कारखानाच्या ऊस विकास योजनेचा लाभ घेण्यासाठी कारखाना बाकी विचारात घेतली जाईल.ज्या ऊस उत्पादक सभासदांची कारखाना थकबाकी रक्कम जास्त आहे अशा सभासदांना ऊस विकास योजनेचा लाभ दिला जाणार नाही.तसेच एकत्रित कुटुंबातील कारखाना थकबाकी ही प्राधान्याने ऊस गाळपास आल्यानंतर ऊस बिलातुन अग्रहक्काने वसुल केली जाईल.

**९.५ मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रकीय सुचनेनुसार सभासद/बिगर सभासदांची कारखान्याकडे ऊस नोंद घेतांना शेतकऱ्यांचा ७/१२ उतारा, ८अ खाते क्रमांक,आधार कार्ड, मोबाईल नंबर व बँक खाते पासबुक नंबरची माहिती घेणे साखर कारखान्यांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदरची माहिती असल्याशिवाय ऊस नोंद स्विकारली जाणार नाही.**

**९.६ कारखान्यामार्फत रासायनिक खते,तणनाशके किंवा इतर वस्तुरूप सहाय्य घेतेवेळी स्वतःचे ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. तसेच कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावे रासायनिक खते इत्यादी घेण्यासाठी संबधित व्यक्तीचे संमतीपत्र बंधनकारक राहील.**

वरील नियम व अटी ह्या प्राथमिक स्वरुपाच्या असुन त्यामध्ये वाढ अथवा सुधारणा करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे.

तरी सर्व ऊस उत्पादकांना विनंती करण्यात येते की,लागवड हंगाम २०२४-२५ करीता जास्तीत जास्त पुर्वहंगामी ऊस लागवडी कराव्यात.कार्यक्षेत्रातून ऊस उपलब्धता वाढविण्याकरीता सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

**आपला विश्वासु,**

**एस.एस.कोल्हे**

**प्रभारी कार्यकारी संचालक**